महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक .१०/०३/२०२५

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन,वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२५/प्र.क्र०४/२५/कोषा.प्रशा.५ दि.७ मार्च २०२५

**विषय :-** आर्थिक वर्ष २०२४-२५ अखेर मार्च महिन्यात सर्व प्रशासकीय विभाग तसेच अधिदान व लेखा लेखा कार्यालय, मुंबई/ जिल्हा कोषागार कार्यालये/ उप कोषागार कार्यालये यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना

******

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र शासन,वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२५/प्र.क्र०४/२५/कोषा.प्रशा.५, दि.१० मार्च २०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०३०७१६४२१८४३०५ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकेनुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना / आर्थिक गुन्हे / नियोजन व समन्वय / दहशतवाद विरोधी पथक / विशेष कृती / लोहमार्ग / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / रा.रा.पो.बल ), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर सुरक्षा / नागरी हक्क संरक्षण / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग / व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन / प्रशिक्षण व खास पथके),महाराष्ट्र राज्य, मुंबई.



Scanned with CamScanner

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता / धोरण / नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी का .क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**आर्थिक वर्ष २०२४-२५ अखेर मार्च महिन्यात सर्व प्रशासकीय विभाग तसेच अधिदान व लेखा लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना.......**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्र.- संकीर्ण -२०२५/प्र.क्र.०४/२५/कोषा प्रशा-५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ७ मार्च, २०२५.

**शासन परिपत्रक :**

वित्तीय वर्षाअखेर दरवर्षी मार्च महिन्यात अर्थसंकल्पीय अधिवेशनात पूरक मागणीद्वारे व सुधारीत अंदाजपत्रकाद्वारे विविध विभागांना निधी उपलब्ध करुन दिला जातो. सदर उपलब्ध झालेला निधी दिनांक ३१ मार्च अखेर जिल्हा कोषागार / उपकोषागार कार्यालये तसेच अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे देयके सादर करुन खर्च करणे अनिवार्य असल्यामुळे अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई तसेच जिल्हा कोषागार / उप कोषागार कार्यालयात मार्च महिन्यात सादर होणाऱ्या देयकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होते. त्यामुळे ट्रेझरी नेट, बिम्स, बील पोर्टल, सेवार्थ व ग्रास इ. प्रणालींवर ताण येऊन त्यांचा वेग मंदावण्याचे प्रकार घडतात. तसेच देयकांची तपासणी करण्यासाठी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई तसेच जिल्हा कोषागार कार्यालये आणि उपकोषागार कार्यालये येथील अधिकारी / कर्मचारी यांना पुरेसा कालावधी मिळत नाही. याशिवाय उप कोषागार कार्यालय स्तरावर रात्री उशिरा सादर होणारी देयके, बँकेच्या कामकाजाच्या वेळांमुळे पारित करता येत नाहीत.

यावर्षी दि.२९ मार्च, २०२५ रोजी शनिवार (सार्वजनिक सुटी), दि. ३० मार्च, २०२५ रोजी रविवार, (गुढीपाडवा) व दि. ३१ मार्च, २०२५ रोजी सोमवार (रमजान ईद) या दिवशी सार्वजनिक सुट्टी आहे. तथापि लेखा नियंत्रक कार्यालय, भारत सरकार यांचेकडून दिनांक ३० मार्च, २०२५, रविवार हा दिवस शासकीय व्यवहारासाठी कामकाजाचा दिवस म्हणून घोषित केलेला आहे. त्यामुळे दिनांक ३० मार्च, २०२५ रोजी ई-कुबेर प्रणाली शासकीय व्यवहारासाठी सुरु राहणार आहे. सदर बाब लक्षात घेता कोषागारात मार्च अखेरीस मोठया प्रमाणावर सादर होणा-या देयकांचा ओघ लक्षात घेऊन सदर दि.३० मार्च, २०२५ व दि.३१ मार्च, २०२५ रोजी कोषागारे व बँका कार्यालयीन कामकाजासाठी सुरु ठेवण्यात येत आहेत.

अशा प्रकारे मार्च अखेर उद्भवणा-या अडचणीवर मात करण्यासाठी सर्व प्रशासकीय विभाग त्यांच्या अधिनस्त सर्व क्षेत्रिय कार्यालये, आहरण व संवितरण अधिकारी तसेच अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / सर्व जिल्हा कोषागार कार्यालये व उप कोषागार कार्यालये यांनी खालील प्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

**१) दि. ३१ मार्च, २०२५ रोजी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये आणि उप कोषागार कार्यालये येथील देयके स्वीकृती व प्रदानाचे काऊंटर उशीरापर्यंत सुरु ठेवणे बाबत :-**

मार्च अखेरीस दि. ३१ मार्च, २०२५ रोजी शासनाचा निधी अखर्चित राहू नये यासाठी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये दि. ३१ मार्च, २०२५ रोजी

रात्री उशिरापर्यंत चालू ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर दिवशी देयक स्वीकृती व ई-कुबेरद्वारे (अत्यंत अपवादात्मक प्रकरणी धनादेश ) प्रदानाची कामे पूर्ण करता येतील.

## २) दि. ३१ मार्च,२०२५ रोजी शासकीय प्रदाने धनादेशा ऐवजी e-kuberद्वारे करण्यास मंजूरी देणे :-

दि. ३१ मार्च, २०२५ रोजी शासकीय प्रदाने केवळ e-Kuber payment mode द्वारेच करण्यात यावी. अत्यंत अपवादात्मक प्रकरणी (जसे की न्यायालयीन आदेशान्वये न्यायालयात जमा करण्यासाठी धनादेशाद्वारे करावयाची प्रदाने इ.) धनादेशाद्वारे प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येईल.

दि. ३० मार्च, २०२५ रोजी रविवार सुट्टीच्या दिवशी ई-कुबेर प्रणालीद्वारे शासनाचे आर्थिक व्यवहार सुरू राहणार असल्याचे भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई, बँकींग विभाग यांचे निर्देश दि.०३ जानेवारी, २०२५ अन्वये प्राप्त झालेले आहेत. मागील वर्षी मार्च महिन्यामध्ये सादर झालेल्या देयकांचे प्रदान ३१ मार्च रोजी व त्यांनतर सुध्दा धनादेशाऐवजी ई-कुबेरद्वारा करण्याचा यशस्वी प्रयोग कोषागार कार्यालय, अकोला येथे करण्यात आला होता. सदर बाब विचारात घेवून सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात दि.३१ मार्च, २०२५ रोजी सर्व कोषागारांमध्ये सादर होणा-या देयकांचे प्रदान हे रात्री १२.०० नंतर सुध्दा धनादेशाद्वारे न करता ई-कुबेर प्रणाली मार्फत करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

## २.१) ई-कुबेर कार्यपध्दती प्रदानासंदर्भात अधिदान व लेखा कार्यालय,मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये यांनी करावयाची कार्यवाही.:-

अ) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई आणि सर्व जिल्हा कोषागार कार्यालये यांनी दि. ३१ मार्च,२०२५ रोजी सर्व प्रदाने e-kuber payment mode द्वारेच करणेबाबतची कार्यवाही करावी. तसेच अत्यंत अपवादात्मक प्रकरणी (जसे की न्यायालयीन आदेशान्वये न्यायालयात जमा करण्यासाठी ) धनादेशाचा वापर करावा. अन्यथा सर्व प्रदाने e-kuber प्रणाली द्वारा करण्यात यावीत.

आ) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई आणि जिल्हा कोषागार कार्यालय यांच्या कार्यक्षेत्रातील संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी ई-कुबेर प्रणालीद्वारे करण्यात आलेल्या प्रदानास दि. ३१ मार्च,२०२५ रोजी मान्यता (Approval ) देण्याची कार्यवाही पूर्ण करावी. खबरदारी म्हणून संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर प्रदानास विहित मुदतीत मान्यता दिल्याची खातरजमा अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई /जिल्हा कोषागार कार्यालये यांनी करावी.

इ) तथापि, आहरण व संवितरण अधिकारी यांचे द्वारा दि. ३१ मार्च,२०२५ रोजी ई-कुबेर प्रणालीद्वारे करण्यात आलेल्या प्रदानास मान्यता (Approval) देण्याची कार्यवाही पूर्ण न केल्यामुळे प्रदान न झाल्यास आणि परिणामी अनुदान व्यपगत झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. त्यासाठी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये जबाबदार राहणार नाहीत.

## २.२) ई-कुबेर कार्यपध्दती प्रदानासंदर्भात उप कोषागार कार्यालयांनी करावयाची कार्यवाही.

अ) राज्यातील सर्व उप कोषागार कार्यालयांमध्ये प्रदानांसाठी आता फक्त ई-कुबेर प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर उप कोषागार स्तरावर ई-कुबेर प्रणालीद्वारे प्रदान करण्यासाठी देयके स्वीकृती कार्यवाही दि.३१ मार्च, २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत पूर्ण करण्यात यावी.

आ) दि.३१ मार्च,२०२५ रोजी सर्व प्रदान e-kuber payment mode द्वारे प्रदानाबाबतची कार्यवाही करताना संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या मान्यतेसह प्रदानाची पुढील कार्यवाही (Push to RBI process ) रात्री ८.०० पर्यंत करण्यात यावीत. खबरदारी म्हणून संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर प्रदानास विहित मुदतीत मान्यता दिल्याची खातरजमा उप कोषागार कार्यालयांनी करावी.

इ) तथापि आहरण व संवितरण अधिकारी यांचे द्वारे दि.३०.०३.२०२५ /दि.३१.०३.२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत ई-कुबेर प्रणालीद्वारे करण्यात आलेल्या प्रदानास मान्यता (Approval ) देण्याची कार्यवाही पूर्ण न केल्यामुळे प्रदान न झाल्यास आणि परिणामी अनुदान व्यपगत झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. त्यासाठी उपकोषागार कार्यालये जबाबदार राहणार नाहीत.

## ३) अधिदान लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये यांनी आक्षेपित केलेली देयके दि.१५ मार्च, २०२५ पूर्वी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई /जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे फेरसादर करणे :-

माहे एप्रिल, २०२४ ते फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत अधिदान लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये यांनी आक्षेपित केलेली देयके आहरण व संवितरण अधिकारी यांचे कडून वर्षाअखेरीस एकदम फेरसादर केली जाऊ शकतात. आर्थिक वर्ष अखेरीस अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई, जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे सादर केल्या जाणा-या एकूण देयकांचा ओघ पाहता अशा फेरसादर देयकांची काटेकोर तपासणी करणे अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथील अधिकारी / कर्मचारी यांना वेळेअभावी शक्य होत नसल्याने त्यात अनियमितता घडू शकतात.

या पार्श्वभूमीवर अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये यांनी यापूर्वी म्हणजेच माहे एप्रिल, २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत किंवा त्या पूर्वी आक्षेपित केलेली आणि दिर्घ काळापासून अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे फेरसादर न झालेली सर्व देयके संबंधित आहरण व संवितरण अधिकारी दि.१५ मार्च, २०२५ पर्यंतच फेर सादर करु शकतील. दि. १५ मार्च, २०२५ नंतर अशा प्रकारची देयके अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे स्विकारली जाणार नाहीत.

**४) काही विशिष्ट प्रकारची देयके दि.१५ मार्च, २०२५ पूर्वी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे सादर करणे .:-**

प्रशासकीय विभागांकडे उपलब्ध असलेल्या अनुदानाची खालील बाबींची देयके दि.१५ मार्च, २०२५ पर्यंतच अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे सादर करण्यात यावीत. दि.१५ मार्च, २०२५ नंतर अशा प्रकारची देयके अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे स्विकारली जाणार नाहीत. त्यांनतर अशी देयके पुढील वर्षाच्या अनुदानातून काढण्यात यावीत.

(१) प्रवास भत्ता देयके.
(२) आस्थापना विषयक पुरवणी देयके.
(३) वैदयकीय खर्च प्रतिपूर्ती देयके.

तथापि , जर उपरोक्त बाबींसाठी पुरवणी मागण्या (मार्च -२०२५) व सुधारीत अंदाजपत्रकानुसार अनुदान मंजूर झाले असेल, तर मात्र सदर बाबींसाठीची देयके दि.१५ मार्च, २०२५ नंतर अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालये येथे स्विकारण्यात येतील.

**५) प्रपत्र बिजक (Proforma Invoice ) जोडून सादर होणा-या देयकांबाबत :-**

मार्च महिन्याच्या अखेरीस उपलब्ध निधी खर्च करण्याचे हेतूने माल/वस्तू प्राप्त झालेला नसताना देखील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून प्रपत्र बिजक (Proforma Invoice ) जोडून म.को.नि. नमुना ३१ अथवा २८ मध्ये देयके सादर केली जातात व ती पारीत करणेबाबत संबंधित विभागांकडून अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ जिल्हा कोषागार अधिकारी / उप कोषागार अधिका-यांना विनंती/आग्रह केला जातो. वस्तुत: प्रपत्र बीजक हे फक्त संक्षिप्त देयकांसोबत जोडणे अभिप्रेत आहे.

महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ मधील नियम ३०२ व ३०३ व महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ मधील परिशिष्ट - एक मधील विवरणपत्र दोन मध्ये नमूद केलेल्या बाबींसाठीच संक्षिप्त देयकांवर रक्कम काढता येते.

या पार्श्वभूमीवर आहरण व संवितरण अधिकारी यांनी प्रपत्र बिजक ( Proforma Invoice ) जोडून म. को. नि.नमुना ३१ अथवा २८ मध्ये देयक सादर केली असतील, तर अशी देयके अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालय / उप कोषागार कार्यालये यांनी पारित करु नयेत.

पुरवठादारांकडून खरेदी केलेल्या वस्तूंचा पुरवठा करण्यात आला असेल व म. को. नि.नमुना ३१ अथवा २८ सोबत अंतिम देयके / Final Bill/ नियमित प्रमाणके / पावत्या जोडल्या असतील तरच अन्यथा परिपूर्ण असल्यास अशी देयके पारित करण्यात यावीत.

**६) जिल्हा कोषागार कार्यालय स्तरावर सादर होणे आवश्यक असणारी देयके उप कोषागार कार्यालय स्तरावर सादर न करणे :-**

सुधारीत अंदाजपत्रक व पुरवणी मागणीद्वारे प्राप्त अनुदानातून वैयक्तिक लाभाची मोठया रकमेची देयके महसूल विभाग, कृषी विभाग, आदिवासी विकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग इत्यादी

विभागांच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयांकडून तालुका स्तरावर अनुदान वाटप करुन उप कोषागार कार्यालयांमध्ये वर्ष अखेरीस सादर केली जातात. उप कोषागार कार्यालय स्तरावर एकच लिपीक व एकच सहायक लेखाधिकारी / उप लेखापाल कार्यरत असल्यामुळे अशा देयकांची छाननी करण्यावर मर्यादा येतात व अनियमितता घडण्याचा संभव असतो. त्यामुळे अशी देयके उपकोषागार कार्यालयात सादर न करता जिल्हा कोषागार कार्यालयामध्येच सादर करण्यात यावीत. उप कोषागार स्तरावरील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना याबाबत लेखी स्वरुपात सूचना देण्यात याव्यात.

**७) उप कोषागार कार्यालयामध्ये दि. ३१ मार्च, २०२५ रोजी सांयकाळी ६.०० नंतर देयके स्वीकृती बंद करुन जिल्हा कोषागारात सादर करणे :-**

उप कोषागार कार्यालयामध्ये प्राप्त होणारी देयके, त्या देयकांवर उप कोषागार कार्यालयाकडून करावयाच्या कार्यवाहीस लागणारा अवधी व बँकेच्या कामाचा कालावधी पहाता उप कोषागार कार्यालयामध्ये दि. ३१ मार्च, २०२५ रोजी सांयकाळी ६.०० नंतर देयके स्वीकृती बंद करण्यात येईल. ( कोकण भवन, उपकोषागार कार्यालय वगळून )

**८) नियंत्रक अधिका-यांनी पुरवणी मागणीद्वारे प्राप्त अनुदान त्वरीत बिम्स (BEAMS) प्रणालीवर उपलब्ध करुन देणे :-**

शासनाकडून विविध विभागांना आठमाही सुधारीत अंदाजपत्रकानूसार तसेच पुरवणी मागण्याद्वारे अनुदान मंजूर केल्यानंतर प्रशासनिक विभाग व विभाग प्रमुखांकडून बिम्स (BEAMS) प्रणालीवर उशिराने आहरण व संवितरण अधिका-यांना अनुदान उपलब्ध करुन दिले जाते, त्यानंतर देयके तयार करणे, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालये / उप कोषागार कार्यालय यांना सादर करणे, इत्यादी कार्यवाही करण्यास विलंब होतो. वाढीव भारामुळे दि.३१ मार्च रोजी बिम्स (BEAMS) प्रणाली, बील पोर्टल तसेच ट्रेझरी नेट प्रणाली यावर अतिरिक्त ताण येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरीता सर्व विभागांनी/नियंत्रण अधिकारी यांनी सुधारीत अर्थसंकल्प / पुरवणी मागणीद्वारे प्राप्त अनुदान बिम्स (BEAMS) प्रणालीवर त्वरीत उपलब्ध करुन दयावे.

**९) प्रादेशिक सह संचालक, लेखा व कोषागारे यांनी मार्च महिन्यातील कामकाजाच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही :-**

(अ) प्रादेशिक सह संचालक, लेखा व कोषागारे कार्यालयांनी माहे मार्च २०२५ मध्ये जिल्हा कोषागार कार्यालयातील कामकाजाच्या अनुषंगाने शासन तसेच संचालनालय स्तरावरुन प्राप्त होणाऱ्या सुचना, परिपत्रके, शासन निर्णय यांची अंमलबजावणी जिल्हा कोषागार / उपकोषागार कार्यालय यांचे कडून काटेकोरपणे केली जाईल या दृष्टीने नियंत्रण ठेवावे.

(आ) प्रादेशिक सह संचालक, लेखा व कोषागारे यांनी त्यांचे अधिनस्त जिल्हा कोषागार कार्यालय आणि उप कोषागार कार्यालयांतील रिक्त पदांचा आढावा घेऊन ज्या जिल्हा कोषागार कार्यालयात आणि उप कोषागार कार्यालयात कामकाज करण्यासाठी मनुष्यबळ अपुरे पडत असेल अशा ठिकाणी योग्य ते नियोजन करुन सह संचालक कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी.

(इ) मार्च महिन्यातील कामाचा निपटारा करण्यासाठी जिल्हा कोषागार कार्यालय / उप कोषागार कार्यालयांतील अधिकाऱ्यांची आढावा बैठक आयोजित करण्यात यावी व त्यानुसार जिल्हा कोषागार कार्यालयांनी मांडलेल्या समस्यांच्या अनुषंगाने नियमोचित मार्गदर्शन करण्यात यावे आणि समुचित उपाययोजना करण्यात याव्यात.

(ई) मार्च अखेरीस केल्या जाणा-या कोषागारातील कामकाजावर सह संचालक कार्यालयांमार्फत नियंत्रण ठेवण्यात यावे व त्याचा प्रगती अहवाल संचालनालय, लेखा व कोषागारे कार्यालयास वेळोवेळी सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून,त्याचा संकेतांक २०२५०३०७१६४२१८४३०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR

Digitally signed by DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=b8e8c3a034acb70f16af6f81c69ca038ff6f25ff78cfc9e6d815fd95b5367b07, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=37A42E182BACE4C129ABBEB54E27836D32D401560638F644A547867205474EE5, cn=DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
Date: 2025.03.07 16:44:08 +05'30'

**(डॉ.राजेंद्र सुमन उत्तमराव गाडेकर)**
**शासनाचे उप सचिव**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव / प्रधान सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव ,
४. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
६. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
८. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
९. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१०. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई
११. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१२. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२
१५. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन*, नागपूर ४४४००१
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१८. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई

१९. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२०. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२१. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२२.विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२३.सर्व विभागीय आयुक्त
२४.सर्व जिल्हाधिकारी
२५.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२६.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२७.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२८. सह संचालक, लेखा व कोषागारे,कोकण/पुणे/ नाशिक/छत्रपती संभाजी नगर/अमरावती/ नागपूर
२९.संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई
३०.सह संचालक, स्थानिक निधी लेखा मुंबई/ पुणे/ नाशिक/ छत्रपती संभाजी नगर/ अमरावती/ नागपूर
३१.वित्त विभागातील सर्व कार्यासने
३२.निवड नस्ती कोषा प्रशा.५